

महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV

कोविड-19 इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) 413 501

e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमधा/भांडार/दरपत्रके/ 3867 /२०२६, दिनांक: 17 /११/२०२६

दरपत्रके

प्रति,

---.

विषय :- सनदी लेखापाल (CA) नेमणुकीकरिता दरपत्रके प्रसिध्द करणे बाबत...

संदर्भ :- १) प्रशासकीय अधिकारी यांचे मागणीपत्र क्र.२९१३/२०२६, दिनांक ०८/०९/२०२६

२) दिनांक १७ /११/२०२६ रोजीची कार्यालयीन मंजुर टिप्पणी.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव अधिनस्त सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे दरमहा आयकर कपात करणे, फॉर्म नं.१६ महाविद्यालयामार्फत देणे, देयकामधुन करण्यात येणाऱ्या कपाती उदा.जी.एस.टी./टी.डी.एस. इत्यादी परतावे वेळेत भरणे इ. कार्यालयीन कामकाजासाठी सनदी लेखापाल (CA) यांची नेमणुक करण्याची संस्थेस आवश्यकता आहे.

तरी सोबत जोडलेल्या दरपत्रकात नमुद सुविधा पुरवठा करणेकामी पात्र निविदा धारकांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. यास्तव दि. 21 /-12-/२०२६ ते दि. 23 /-12-/२०२६ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी दरपत्रकातील विहित अटी व शर्तींना अनुसरुन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये खालील नमुद पत्त्यावर आपले दरपत्रक सादर करण्यात यावे. सिलबंद पाकीटावर मध्यभागी **"सनदी लेखापाल (CA) नेमणुकीकरिता दरपत्रके"** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

सोबत: दरपत्रक नोटीस जोडली आहे.

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

प्रत:- १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.
२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.
३) अध्यक्ष, खरेदी समिती, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

कार्यालयाचा पत्ता

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,
धाराशिव-४१३५०१

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

दरपत्रक नोटिस

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या लेखाविषयक विविध कामकाजाकरिता सनदी लेखापाल (CA) यांची नेमणुक करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक निविदाधारकांनी दि. 21/09/२०२६ ते दि. 23/09/२०२६ पर्यंत अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यात तसेच अटी व शर्तींना अनुसरुनच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Sr. No.	Particulars	Frequency (Month/Quarter/Person)	Amount (without GST)
1.	Contracted TDS Form (26Q) 140	Quarterly	
2.	Employees Salary Form (24Q) 138	Quarterly	
3.	GST TDS Form 7	Monthly	
4.	Generating & Printing Form (16) 138	Annualy	
5.	Generating & Printing Form (16A) 140	Quarterly	

अटी व शर्ती:

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक 23/09/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"सनदी लेखापाल (CA) नेमणुकीकरिता दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०३) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज:

१) निविदाधारक फर्म भारतीय सनदी लेखापाल संस्थेकडे (ICAI) नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे (नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक).

२) फर्मचे नोंदणी प्रमाणपत्र (ICAI Registration Certificate) किमान ३ वर्षे पूर्ण झालेली असावीत.

३) Certificate of Practice (COP)

४) फर्मचा पॅन कार्ड (PAN)

५) जीएसटी (if applicable) नोंदणी क्रमांक.

६) शासकीय किंवा निमशासकीय कामांचे अनुभव प्रमाणपत्र (Experience Certificate).

७) फर्म कोणत्याही शासकीय संस्थेद्वारे काळया यादीत (Blacklisted) टाकलेली नाही, याबाबतचे १०० रुपयांच्या बाँड पेपरवरील प्रतिज्ञापत्र (Affidavit).

८) एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र "ANNEXURE-A" (सोबत नमुना जोडला आहे).

वरील सर्व दस्तऐवज जोडणे बंधनकारक आहे **(दिलेल्या क्रमाने जोडण्यात यावेत).**

०४) सर्वात कमी दराची (L-१) निविदा सादर करणाऱ्या पात्र फर्मचा नियुक्तीसाठी विचार केला जाईल.

०५) कामाचा कालावधी: प्राथमिक नियुक्ती १ वर्षासाठी असेल. काम समाधानकारक असल्यास प्रशासनाच्या मान्यतेने हा कालावधी आणखी १ वर्षासाठी वाढवला जाऊ शकतो.

०६) कामाचे ठिकाण: निवड झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीला महाविद्यालयाच्या लेखा विभागात प्रत्यक्ष उपस्थित राहून काम करावे लागेल.

०७) गोपनीयता: महाविद्यालयाच्या कोणत्याही वित्तीय व्यवहारांची किंवा कागदपत्रांची माहिती बाहेरील व्यक्तीस देण्यास सक्त मनाई असेल (Confidentiality Agreement).

०८) निविदा रद्द करण्याचा अधिकार: कोणतीही कारणे न देता सर्व किंवा एखादी निविदा नाकारण्याचा अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याकडे राखून ठेवण्यात आला आहे.

०९) वाद निवारण: निविदा प्रक्रियेदरम्यान किंवा कामाच्या कालावधीत काही वाद निर्माण झाल्यास, अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांचा असेल व तो बंधनकारक राहील.

१०) ठरलेले मानधन [त्रैमासिक/सहामाही/वार्षिक] तत्त्वावर आणि काम समाधानकारक पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच अदा केले जाईल.

११) नियमानुसार देय मानधनातून टीडीएस (TDS) कपात केला जाईल.

नोंद:- सदर दर पत्रके मा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक. 24/09/२०२६ रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव

ANNEXURE-A

एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेडवर

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. _____
दिनांक _____

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत वितरकाचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहर
Authorized Person Name,
Signature
with Stamp and Seal